गोवादूत : पणजी – शनिवार, १२ डिसेंबर २०१५



➲ प्रेमानंद देसाई यांना छ. शिवाजी महाराजीची प्रतिमा भेट देताना प्राचार्य डॉ. व्ही.ए. पाटील. सोबत पोलिस अधीक्षक दत्तात्रय शिंदे व अन्य.

# विद्यापीठस्तरीय निवासी शिबिराची केर येथे सांगता

## ➲ कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली : दत्तात्रय शिंदे

दोडामार्ग, दि. ११ (प्रतिनिंधी)

''आगामी काळातील स्पर्धेत यशस्वी व्हायचे असेल व अब्दुल कलामांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर तरुणांनी निर्व्यसनी राहण्याची, सर्वांगीण विकास साधताना वेळेची किंमत जाणण्याची व क्षणिक सुखामागे न धावता परिश्रम घेण्याची गरज आहे. नकारात्मक विचारांना वर्ज्य करून, सकारात्मक गोष्टी अंगीकृत केल्या तर देशाचे उज्वल भविष्य तरुणांच्या हातून घडेल'' असे उद्गार सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी काढले. केर येथे मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालत दोडामार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवशीय विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर केर–भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच प्रेमानंद देसाई, नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे व डॉ. एस. यु. दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहभागी शिबीरार्थीना मार्गदर्शन करताना शिंदे पुढे म्हणाले की, देशाचा विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत महत्वाचे आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी युवाशक्तीने एकत्र येऊन पर्यावरण संवर्धन करण्याची गरज आहे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नेहमीच तरुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देते. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना सरपंच प्रेमानंद देसाई यांनी शिबीर कालावधीत आलेले अनुभव व्यक्त केले तसेच उपस्थितांना ग्रामपंचायतीच्या विकासा कामांची माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणांत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी स्वयंसेवकांना शिबीर कालावधीत मिळालेले ज्ञान व अनुभव आचरणात आणण्यांचे व पर्यावरण संवर्धनात पुढाकार घेण्याच आवाहन केले.

समारोप समारंभात शिबीरादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धातील विजेत्यांना पारितोषिके व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सरपंच प्रेमानंद देसाई यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्यांना छ. शिवाजी महाराजांचे तैलचित्र देऊन महाविद्यालयातर्फे सन्मानित करण्यात आले. या समारंभात प्रतिनिधीक स्वरुपात तीन स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना गीताने सांगता समारोहाची सुरावात करण्यात आली. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी व्यासपिठावरील अतिथींचे स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये प्रा. आर. ए. मोरे. प्रा. डॉ. एस. यू. दरेकर, प्रा. एल. के. कदम व प्रा.एस. एस. देसाई यांनी अथक परिश्रम घेतले.